मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेच्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

## स्त्री-पुरुष समानता, बंधुता आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश आजही प्रेरणादायी : महापौर रवि लांडगे

**पिंपरी | प्रतिनिधी**

बाराव्या शतकातील थोर समाजसुधारक महात्मा बसवेश्वर महाराज यांनी नागरिकांना स्त्री-पुरुष समानतेबरोबरच एकात्मता, बंधुता, अहिंसा तसेच अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश दिला,प्रत्येक माणसाला जीवन जगण्याची समान संधी मिळावी त्यात कोणताही भेदभाव करण्यात येऊ नये याकरिता सतत कार्यरत असणारे महात्मा बसवेश्वर यांच्या व्यापक विचारसरणीचा वारसा सर्वांनी जोपासावा असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्यील महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



अभिवादन कार्यक्रमास कर्नाटकातील बसवकल्याण विधानसभा मतदारसंघाचे आमदार शरणू सलगर यांच्यासह उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, महापालिका जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचे पदाधिकारी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निगडी येथील महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्र+मास आमदार शरणू सलगर, उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती कैलास कुटे,माजी उपमहापौर तथा नगरसदस्या शैलजा मोरे,नगरसदस्य अमित गावडे, माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे, मोरेश्वर भोंडवे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक विविध संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित सामाजिक समता सप्ताह व विचार प्रबोधन पर्वाची सांगता..!

## अभिजित कोसंबी, मेघानंद जाधव व मधुकर कदम यांच्या गीतांनी दिला समतेचा संदेश, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांची जागर करणाऱ्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित सामाजिक समता सप्ताह व विचार प्रबोधन पर्व २०२६ चा समारोप सुरेल संगीत, मधुर स्वर आणि भीम गीतांच्या संगमात उत्साहपूर्ण वातावरणात झाला.




या पर्वाच्या समारोप प्रसंगी प्रसिद्ध गायक अभिजित कोसंबी यांनी स्वरांच्या नादमधुर लहरींनी वातावरण भारावून टाकत, भीम गीतांच्या सादरीकरणातून समतेचा संदेश देत उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.

या विचार प्रबोधन पर्वामध्ये सप्ताहभर विविध प्रबोधनात्मक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये महात्मा जोतीराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची जागरूकता निर्माण करण्यात आली. तर या सप्ताहाच्या समारोपाच्या दिवशी प्रसिद्ध गायकांचे गीत गायन ठेवण्यात आले होते.

समारोपाच्या दिवशी आयोजित गीत गायन कार्यक्रमाला विशेष प्रतिसाद मिळाला. अभिजित कोसंबी यांच्यासह मेघानंद जाधव आणि मधुकर कदम यांनीही आपल्या सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या गायनातून सामाजिक समतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात आला.

या संपूर्ण उपक्रमाद्वारे समाजात समता, बंधुता आणि एकात्मतेची मूल्ये अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# मावळ MIDC प्रकल्पासाठी बऊर-करुंजमध्ये जमीन व्यवहारांना ब्रेक

## जमीन संपादनासाठी योग्य मोबदल्याचे आश्वासन, तरीही ग्रामस्थांचा एकमुखी विरोध कायम

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील बऊर, करुंज व बाह्मणवाडी येथील जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार तात्पुरते बंद करण्यात येतील. हा प्रकल्प होणार असून, याबाबत वरिष्ठांना सविस्तर माहिती देऊन अंतिम निर्णय त्यांच्या स्तरावर घेतला जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

मावळ तालुक्यातील बऊर, करुंज व बाह्मणवाडी येथील शेतकरी आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यात प्रस्तावित एमआयडीसी प्रकल्पासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. या वेळी माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, मावळ-मुळशीचे उपविभागीय अधिकारी सुरेंद्र नवले, तहसीलदार विक्रम देशमुख, भाजप किसान मोर्चाचे माजी प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे, भरत मोरे, संतोष दळवी आदी उपस्थित होते.



### शेतकऱ्यांचा विरोध कायम

» प्रस्तावित एमआयडीसी प्रकल्पाला बऊर, करुंज व बाह्मणवाडी परिसरातील ग्रामस्थांनी एकमताने विरोध दर्शविला आहे. एजंटांच्या माध्यमातून होत असलेल्या जमीन खरेदी-विक्री व्यवहारांवर तात्काळ बंदी घालावी, अशी मागणी करण्यात आली.

या वेळी जिल्हाधिकारी डॉ. डुडी यांनी सांगितले की, मोजणी प्रक्रियेला विरोध कोणीही करू नये. जमीन संपादन प्रक्रियेत शेतकऱ्यांना योग्य मोबदला दिला जाईल. या भागात एमआयडीसी झाल्यास मोठ्या प्रमाणावर विकास होईल. तसेच, स्थानिकांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असेही त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच हा प्रकल्प मार्गी लावला जाईल, असे सांगत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी असल्यास संबंधित कार्यालयात त्या नोंदवाव्यात, त्यावर योग्य ती कारवाई करून प्रश्न सोडवले जातील, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले. पारदर्शक प्रक्रिया राबवून शेतकऱ्यांचे हित जपावे, अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली. दरम्यान, शेतकऱ्यांना योग्य मोबदला व न्याय देत प्रकल्पाबाबत पुढील निर्णय घेतला जाईल, असे प्रशासनाने सांगितले.

मावळ तालुक्यातील प्रस्तावित एमआयडीसी प्रकल्पाला बऊर, करुंज व बाह्मणवाडी परिसरातील ग्रामस्थांनी एकमताने विरोध दर्शविला आहे. एजंटांच्या माध्यमातून होत असलेल्या जमीन खरेदी-विक्री व्यवहारांवर तात्काळ बंदी घालावी, अशी मागणी करण्यात आली.

### शेतकऱ्यांना योग्य मोबदला दिला जाणार

» शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच हा प्रकल्प मार्गी लावला जाईल, असे सांगत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी असल्यास संबंधित कार्यालयात त्या नोंदवाव्यात, त्यावर योग्य ती कारवाई करून प्रश्न सोडवले जातील, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले. पारदर्शक प्रक्रिया राबवून शेतकऱ्यांचे हित जपावे, अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली. दरम्यान, शेतकऱ्यांना योग्य मोबदला व न्याय देत प्रकल्पाबाबत पुढील निर्णय घेतला जाईल, असे प्रशासनाने सांगितले.

“ ग्रामस्थांनी प्रस्तावित एमआयडीसीला एकमताने विरोध दर्शवत या भागात एजंटगिरीच्या माध्यमातून चुकीच्या पद्धतीने सुरू असलेल्या दस्ताची नोंदणी बंद व्हावी, अशी मागणी केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ बऊर हद्दीतील दस्त नोंदी थांबविण्याचे आदेश या वेळी दिले. सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या पाठीमागे आम्ही ठामपणे उभे आहोत.

- बाळा भेगडे, माजी राज्यमंत्री

# आकुर्डीतील संत ज्ञानेश्वर चौकात सिग्नल बंद; वाहतूक कोंडीने नागरिक हैराण

## स्वयंचलित यंत्रणा ठप्प, पर्यायी व्यवस्था नाही; अपघाताचा धोका वाढल्याने वाहतूक पोलिस नेमण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका अ प्रभाग कार्यालयाजवळील संत ज्ञानेश्वर चौकामध्ये स्वयंचलित वाहतूक नियंत्रण करणारी सिग्नल यंत्रणा बंद पडल्यामुळे वाहतूक कोंडीबरोबरच वाहनचालकांना विस्कळीत वाहतुकीचा सामना करावा लागत आहे.

संत ज्ञानेश्वर चौकातील स्वयंचलित सिग्नल यंत्रणा बंद असल्यामुळे यावरती कोणतीही पर्याय व्यवस्था वाहतूक नियंत्रण अधिकारी यांनी केली नसल्यामुळे या चौकात विस्कळीत व वाहतूक कोंडीबरोबरच वाहनचालकांना जीव मुठीत धरून चौक पार करावा लागत आहे. संत ज्ञानेश्वर चौकातील सिग्नल व्यवस्था सातत्याने बंद पडत असल्याने स्थानिकांमध्ये वाहतूक नियंत्रण अधिकारी यांच्याविषयी संतापाची भावना निर्माण झाली आहे.



संत ज्ञानेश्वर चौक हा आकुर्डी, निगडी, चिंचवड या भागांना जोडणारा मध्यवर्ती ठिकाण आहे. या चौकात दिवसभर सातत्याने चारही बाजूने वाहनांची वर्दळ असते. जवळच अ क्षेत्रीय कार्यालय, लोकमान्य हॉस्पिटल, भक्ती-शक्तीकडे जाणारा रस्ता, तसेच म्हाळसाकांत विद्यालय, सीएमएस विद्यालय, सरस्वती विद्यालय, गुरुगणेश विद्यालय असे अनेक शाळा, महाविद्यालये असून, या चौकातून परिसरातील शालेय विद्यार्थ्यांची व पालकांची ये-जा सुरू असते.

सायंकाळी विविध कंपन्यांच्या बसेस कर्मचाऱ्यांना सोडण्यासाठी या चौकातून जाताना दिसतात. त्याचबरोबर खासगी वाहने, बस, रिक्षा दुचाकी यांची वर्दळ असते. या चौकातील वाहतूक सिग्नल व्यवस्था पूर्णपणे बंद असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होऊन छोटे-मोठे अपघात या ठिकाणी घडतात. स्वयंचलित वाहतूक यंत्रणा बंद पडल्यानंतर महापालिका प्रशासन व वाहतूक विभागाकडून वाहनचालकांची कुठलीही दक्षता घेतली जात नाही. त्यामुळे बेशिस्त वाहनचालकांना संधी मिळत आहे.

या विस्कळीत वाहतूक व्यवस्थेमुळे वाहनांची कोंडी झाली होती. मात्र, याच परिस्थितीमुळे एखादी दुर्घटना घडू शकते. यासाठी वेळीच उपाययोजना करून वाहतूक विभाग व महापालिका प्रशासनाने कार्यवाही करून स्वयंचलित वाहतूक यंत्रणा सुरळीत करावी, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे.

### चौकात वाहतूक पोलिस नियुक्त करा

» बंद सिग्नल यंत्रणा, लाईटची वाजलेले तीनतेरा, दूषित पाणीप्रश्न, रस्त्यांची दुरवस्था अशा विविध कारणाने व वेळोवेळी निर्माण होणाऱ्या या समस्यांमुळे शहरातील नागरिक हैराण आहेत. यावर योग्य तो पर्याय काढून लवकरात लवकर निगडी, आकुर्डी, चिंचवड या भागातील सिग्नल व्यवस्था सुरळीत करावी. तसेच सिग्नल यंत्रणा बंद पडल्यानंतर येथे वाहतूक नियंत्रण करण्यासाठी वाहतूक पोलिस नियुक्त करावा.

# पुणेकरांवर पाणी कपातीची टांगती तलवार; आयुक्तांसमोर तीन पर्याय

## कमी मान्सूनच्या शक्यतेमुळे प्रशासन सतर्क; आठवड्यातून एक दिवस बंद ते दिवसाआड पुरवठ्याचे पर्याय चर्चेत

**पुणे | प्रतिनिधी**

यावर्षी सरासरीपेक्षा कमी मान्सून पडणार असल्याने पाटबंधारे विभागाने पाणीकपातीची सूचना महापालिकेला केली आहे. त्यानुसार प्रशासनाने पालिका आयुक्तांना तीन पर्याय दिले आहेत. पाणी कपात टाळणे, आठवड्यातून एक दिवस पाणी बंद किंवा दिवसाआड पाणी बंद ठेवणे असे तीन पर्याय आयुक्तांसमोर ठेवले आहेत. आता आयुक्त काय निर्णय घेतात याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

भारतीय हवामान खात्याने अल-निनो आणि आयओडीच्या प्रभावामुळे यावर्षी सरासरीपेक्षा कमी मान्सून पडण्याची शक्यता व्यक्त केली आहे. यामुळे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीमधील पाणीसाठा १ ऑगस्ट पर्यंत राखीव ठेवण्याचे नियोजन पाटबंधारे विभागाने केले आहे. त्यासाठी महापालिकेने दरमहा १५ टक्के पाणीकपात करण्याच्या सूचनाही केल्या आहेत.



### धरणसाखळीतील साठा जपण्याचे नियोजन

» खडकवासला धरणसाखळीमधील पाणीसाठा १ ऑगस्टपर्यंत टिकवून ठेवण्यासाठी पाटबंधारे विभागाने विशेष नियोजन केले आहे. शहराला सध्या १६२२.५ एमएलडी पाणीपुरवठा केला जातो. त्यात १५ टक्के कपात करायची झाल्यास सुमारे २५३.८७ एमएलडी पाणी कमी उचलावे लागेल. मात्र, पुण्याच्या भौगोलिक रचनेमुळे उंच भाग आणि टाकीपासून दूरच्या परिसरात पाणीटंचाई तीव्र होण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

त्यानुसार, महापालिका प्रशासनाने पाण्याची सद्यस्थिती तसेच कपात केल्यास काय स्थिती असेल याचा अहवाल महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना सादर केला आहे. अहवालात पहिला पर्याय कपात टाळण्याचा आहे. दुसरा पर्यंत आठवडयातून एक दिवस पाणी बंद ठेवणे तर तिसरा पर्याय दिवसाआड पाणीपुरवठ्याचा आहे. त्यामुळे आता आयुक्त यावर काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शहराची वाढती मागणी आणि विस्तार यानुसार सद्यस्थितीत शहराकरिता १६२२.५ एमएलडी पाणी उचलण्यात येते. सद्यस्थितीत उचलण्यात येणाऱ्या १६२२.५ एमएलडीमधून १५% पाणीकपात करावयाची झाल्यास धरणातून २५३.८७ एमएलडी पाणी कमी उचलावे लागणार आहे. पुणे शहराची भौगोलिक परिस्थिती चढउताराची असल्यामुळे आणि एकत्रित कामे सद्या अपूर्ण असल्यामुळे सरसकट १५% पाणीपुरवठा कमी केल्यास चढाच्या भागातील आणि टाकीपासून लांबच्या अंतरावरील भागामध्ये पाणीपुरवठा अत्यल्प होणे किंवा पाणी उपलब्ध न होणे अशा तक्रारी येतील. त्यामुळे सद्यस्थितीत पाणीपुरवठा कमी करणे शक्य होणार नाही.

### आयुक्तांसमोर तीन पर्याय

» पुणे शहरातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाने आयुक्तांसमोर तीन पर्याय ठेवले आहेत. पहिला पर्याय म्हणजे कोणतीही पाणी कपात न करणे. दुसरा पर्याय आठवड्यातून एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा आहे. तिसरा पर्याय दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा आहे. हवामान विभागाने कमी मान्सूनचा अंदाज व्यक्त केल्याने या उपाययोजनांवर विचार सुरू आहे. आता आयुक्त नवल किशोर राम कोणता निर्णय घेतात, याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

### बंदीमुळे गोंधळ, दिवसाआड पुरवठा शक्य

» आठवड्यातून एक दिवस पाणी बंद ठेवल्यास पुढील दोन ते तीन दिवस पुरवठा सुरळीत होण्यास वेळ लागतो, त्यामुळे नागरिकांमध्ये गोंधळ निर्माण होऊ शकतो. या पद्धतीने सुमारे १० टक्के बचत होऊ शकते. दिवसाआड पाणीपुरवठा केल्यास २५ टक्क्यांपर्यंत बचत होण्याची शक्यता आहे. या पद्धतीत तक्रारी तुलनेने कमी येतात. यापूर्वीही पुण्यात अशा प्रकारचा प्रयोग करण्यात आला होता.

---

# मिळकतकरात ज्येष्ठ नागरिकांना 30 टक्के सवलतीचा दावा? महापालिका प्रशासनाने केला मोठा खुलासा...

## ज्येष्ठ नागरिकांसाठी अशी कोणतीही योजना नाही; नागरिकांनी अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या हद्दीत राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना स्वतःच्या निवासी मालमत्तेवर ३० टक्के मिळकतकरात सवलत मिळते, असा मेसेज समाज माध्यमांवर (सोशल मीडियावर) विशेषतः व्हॉट्सॲपवर मोठ्या प्रमाणात पाठविला जात आहे. मात्र हा मेसेज खोटा असून ही माहिती पूर्णपणे चुकीची आहे. हा निर्णय कोणत्याही अधिकृत शासन निर्णयावर आधारित नाहे, असे पुणे महापालिकेच्या मिळकतकर विभागाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्यातील कोणत्याही महानगरपालिका किंवा नगरपरिषद स्तरावर ज्येष्ठ नागरिकांना सरसकट ३० टक्के मालमत्ता कर सवलत देण्याबाबत कोणताही शासन निर्णय सध्या अस्तित्वात नाही. तसेच या प्रकारची कोणतीही राज्यस्तरीय योजना देखील राज्य सरकारकडून लागू करण्यात आलेली नाही, असे स्पष्टीकरण महापालिकेच्या मिळकत कर आकारणी व कर संकलन विभागाने दिले आहे. गेल्या काही दिवसांपासून ज्येष्ठ नागरिकांना मिळकतकरात ३० टक्के सवलत देण्यात येत असल्याचा मेसेज पाठविले जात आहेत. यावर महापालिका प्रशासनाने हा खुलसा केला असून नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन केले आहे.



महापालिकेच्या मिळकतकर विभागाचे उप आयुक्त रवी पवार यांनी नागरिकांनी याबाबत आवाहन केले आहे. सोशल मीडियावर येणाऱ्या अप्रमाणित मेसेजवर नागरिकांनी कोणताही विश्वास ठेवू नये. मालमत्ता कर सवलती संदर्भातील अचूक माहिती मिळवण्यासाठी नागरिकांनी महापालिकेच्या जवळच्या संपर्क कार्यालयात प्रत्यक्ष भेट द्यावी किंवा अधिकृत संकेतस्थळाचा वापर करावा. दरम्यान, सोशल मीडियावर पसरत असलेली ही माहिती दिशाभूल करणारी असल्याने नागरिकांनी असे मेसेज पुढे पाठवू नयेत तसेच अफवांपासून सावध रहावे, असे आवाहन देखील पवार यांनी केले आहे. महापालिकेच्या मिळकतकर भरणा केंद्रांवर होणारी गर्दी टाळण्यासाठी नागरिकांनी घरबसल्या ऑनलाईन पद्धतीने कर भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### वेळेत मिळकतकर भरा

» महानगरपालिकेच्या कर आकारणी व करसंकलन विभागाच्या वतीने चालू आर्थिक (२०२६-२७) या वर्षातील मिळकतकराची बीले तयार करण्यात आली असून त्याचे वाटप सुरु झाले आहे. जे नागरिक ३१ मे २०२६ पर्यंत मिळकतकर भरतील त्यांना सर्वसाधारण करामध्ये ५ ते १० टक्के सवलत जाहीर करण्यात आली आहे. या मुदतीत मिळकतदारांनी महापालिकेचा संपूर्ण मिळकत कराचा भरणा केल्यास त्यांना ही सवलत मिळणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

# मुळा-मुठा नदीत कचरा टाकण्याचा संतापजनक प्रकार

## हवेली तालुक्यातील नदीपात्र कचरा डेपो बनले; दूषित पाण्यामुळे आरोग्याचा धोका, ठेकेदारांवर कारवाईची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील ओला आणि सुका कचरा थेट हवेली तालुक्यातील अष्टापूर येथील नदीपात्रात फेकला जात असल्याचा संतापजनक प्रकार उघड झाला आहे. यामुळे संपूर्ण परिसरात तीव संतापाची लाट उसळली आहे. संबंधित ठेकेदारांनी अक्षरशः नदीला कचरा डेपो बनवले असून, प्रशासन याकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप होत आहे.

येथे दररोज अनेक वाहनांतून दिवसरात्र कचरा नदीत टाकला जातो. यामुळे पाण्याचा रंग, वास आणि गुणवत्ता पूर्णपणे बिघडली आहे. या दूषित पाण्यामुळे स्थानिक नागरिक आणि जनावरांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. अनेक ठिकाणी जनावरांना आजार होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

या भागातील पिण्याच्या पाण्याच्या योजना मुळा-मुठा नदीवर अवलंबून असल्याने परिस्थिती अधिकच भीषण बनली आहे. हजारो नागरिकांना दूषित पाणी पिण्याची वेळ येत आहे. यामुळे भविष्यात मोठ्या आरोग्य संकटाची शक्यता व्यक्त केली जात आहे. हा धक्कादायक प्रकार अनेक दिवसांपासून सुरू आहे. मात्र, याकडे स्थानिक प्रशासन, संबंधित महापालिका यंत्रणा आणि अधिकारी काणाडोळा करत असल्याचा आरोप होत आहे.



### आरोग्यावर गंभीर परिणामाची भीती

**» नदीपात्रात टाकल्या जाणाऱ्या कचऱ्यामुळे पाण्याचा रंग, वास आणि गुणवत्ता बिघडल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. या दूषित पाण्याचा परिणाम नागरिकांसह जनावरांच्या आरोग्यावर होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. काही ठिकाणी जनावरांना आजार होत असल्याचेही सांगितले जात आहे. मुळा-मुठा नदीवरील पाणीपुरवठा योजनांवर या प्रदूषणाचा परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. भविष्यात मोठे आरोग्य संकट निर्माण होऊ शकते, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.**

दरम्यान, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि राष्ट्रीय हरित लवाद यांनी तातडीने या गंभीर प्रकरणात हस्तक्षेप करून संबंधित ठेकेदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा, नागरिक रस्त्यावर उतरून तीव आंदोलन छेडण्याच्या तयारीत असल्याचा इशारा देण्यात आला आहे. प्रशासनाने तत्काळ कारवाई केली नाही, तर हा प्रश्न केवळ पर्यावरणाचा न राहता मानवी जीवितहानीचा ठरणार आहे.

त्याची पूर्ण जबाबदारी संबंधित यंत्रणांवरच राहील, असा इशारा नागरिकांनी दिला आहे. या प्रकाराबाबत हवेलीचे उपविभागीय अधिकारी यशवंत माने आणि लोणी काळभोर अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते यांनी ग्राम महसूल अधिकारी व मंडलाधिकारी यांना पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या ठेकेदाराची व त्याला मदत करणाऱ्या स्थानिकांची माहिती घेऊन त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### नदीपात्र कचरा डेपो बनल्याचा आरोप

**» पुणे शहरातील ओला आणि सुका कचरा हवेली तालुक्यातील अष्टापूर येथील नदीपात्रात टाकला जात असल्याचा गंभीर आरोप स्थानिकांनी केला आहे. दररोज अनेक वाहनांतून कचरा आणून नदीत फेकला जात असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. नदीचे पाणी दूषित होत असून पर्यावरणाला मोठा धोका निर्माण झाला आहे. संबंधित ठेकेदारांनी नदीला कचरा डेपो बनवल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. प्रशासनाने तातडीने तपास करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.**

### पंचनाम्याचे आदेश, आंदोलनाचा इशारा

**» या प्रकाराची दखल घेत हवेलीचे उपविभागीय अधिकारी यशवंत माने आणि लोणी काळभोर अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते यांनी ग्राम महसूल अधिकारी व मंडलाधिकाऱ्यांना पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. दोषी ठेकेदार व संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले आहे. मात्र, तातडीने ठोस कारवाई न झाल्यास नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासनाची पुढील भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.**

# राजगुरुनगरमध्ये अतिक्रमणधारकांवर प्रशासनाचा हातोडा; पुरावे न दिल्यास बुलडोझर कारवाई

## गायरान आणि सरकारी जमिनींवरील बेकायदेशीर बांधकामांवर कठोर पावले; भूमाफियांमध्ये भीतीचे वातावरण

**पुणे | प्रतिनिधी**

तालुक्यातील सरकारी आणि गायरान जमिनींवर बेकायदेशीर अतिक्रमण करून वैयक्तिक बेसुमार फायदा लाटणाऱ्या भूमाफियांवर महसूल प्रशासनाने हातोडा उगारला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या जनहित याचिका क्र. 127/2022 च्या कडक आदेशानंतर प्रांताधिकारी अनिल दौंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार प्रशांत बेडसे आणि पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.

या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात व्यावसायिक अतिक्रमणधारकांना तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या सहीने निष्कासनाच्या (कारणे दाखवा) नोटिसा नुकत्याच




बजाविण्यात आल्या आहेत. दरम्यान, येत्या 24 एप्रिलला सुनावणी ठेवण्यात आली असून, पुरावे न दिल्यास या मिळकतीवर थेट बुलडोझर फिरवला जाणार आहे. या आक्रमक कारवाईमुळे तालुक्यातील भूमाफियांमध्ये दहशत पसरली आहे.

खेड महसूल आणि ग्रामविकास विभागाने गोलेगाव, पिंपळगावतर्फे चाकण आणि परिसरातील गायरान जमिनींची बारकाईने पाहणी केली. यात निवासी तसेच व्यावसायिक अतिक्रमणे उघडकीस आली. प्रशासनाने पारदर्शक पद्धतीने हे सर्वेक्षण पूर्ण केले असून, कायदेशीर रणनीतीनुसार कारवाईचा रोडमॅप तयार केला आहे. प्रशासनाने पहिल्या टप्प्यात फक्त व्यावसायिक गाळे, दुकाने आणि शेड्स यांना

> **“ या कारवाईत सुनावणीमध्ये अतिक्रमणधारक कायदेशीर परवानगीचे पुरावे सादर करू शकले नाहीत, तर थेट बुलडोझर कारवाई करण्यात येणार आहे. मागील 4 वर्षे (किंवा अधिक) काळातील दंडात्मक भाडे वसूल करण्यात येणार आहे. दंड न भरल्यास सातबारा उताऱ्यावर शासनाचा बोजा लादण्यात येणार आहे. याशिवाय संबंधितांवर थेट पोलिस तक्रार दाखल करण्यात येणार आहे.**
>
> **- प्रशांत बेडसे, तहसीलदार, खेड**

लक्ष्य केले आहे.

कारण सर्वोच्च न्यायालय, मुंबई उच्च न्यायालय आणि शासनाच्या स्पष्ट आदेशानुसार, सार्वजनिक जमिनीवरील व्यावसायिक अतिक्रमणे कधीही नियमित (ठशर्सीश्ररीळूश) करता येत नाहीत. निवासी अतिक्रमणांमध्ये काही अपवादात्मक तरतुदी असू शकतात; पण व्यावसायिक बांधकामांना कोणतेही कायदेशीर संरक्षण नाही. त्यामुळे प्रशासनाने प्रथम व्यावसायिक अतिक्रमण जमीनदोस्त करावीत, असा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. प्रांताधिकारी अनिल दौंडे आणि तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी तयार केलेल्या 'ॲक्शन प्लॅन'मुळे खेड तालुक्यात मोठी चर्चा सुरू झाली आहे.